नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जिल्हा स्तरीय समन्वय समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः-नादेकृ-२०१७/प्र.क्र.७ /८-अे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२

तारीख: ३० ऑक्टोंबर, २०१७

<u>वाचा :</u>

१. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. असुअ कक्ष-२०१४/प्र.क्र-१/राकृवियो कक्ष, दि. १९/०५/२०१४
२. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. हअप्र-०७१६/प्र. क्र. ८२/राकृवियो कक्ष, दि. ०७/०७/२०१६
३. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. हअप्र-०७१६/प्र. क्र. ८२/राकृवियो कक्ष, दि. १०/०८/२०१६
४. कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक :- हअप्र-०७१६ / प्र.क्र.८२/ राकृवियो कक्ष, दि.१७/०१/२०१७

<u>शासन परिपत्रक :-</u>

विदर्भ व मराठवाडयातील सुमारे ४००० दुष्काळग्रस्त गावांमध्ये तसेच विदर्भातील पुर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्टयातील सुमारे ९०० गावांमध्ये आगामी ६ वर्ष कालावधीत जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने रु. ४००० कोटी अंदाजित खर्चाचा नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पूर्वीचे नांव हवामान अनुकूल कृषि विकास प्रकल्प) राबविण्यास दि.७.७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयांन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे. या प्रकल्पाची जिल्हा स्तर, उप विभाग स्तर व गाव समूह स्तरावर अंमलबजावणी करण्यात येणार असून प्रकल्पांतर्गत मराठवाडा, विदर्भ व नाशिक विभागातील मिळून एकूण १५ जिल्हयांचा समावेश आहे (औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी, बीड, हिंगोली, अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, वर्धा, जळगाव). या प्रकल्पांतर्गत १५ जिल्ह्यातील हवामान बदलास अतिसंवेदनक्षम ठरणारी ४२१० गावे व पूर्णा नदीच्या खो-यातील खारपाण पट्ट्यातील भूजल क्षारतेची समस्या असलेली ९३२ गावे, अशा एकूण ५१४२ गावांची निवड करण्यात आलेली आहे.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत गाव पातळीवर हाती घ्यावयाच्या कामांचे सुक्ष्म नियोजन करुन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांच्या ग्राम पंचायतीमध्ये “ग्राम कृषि संजीवनी समिती{Village Climate Resilience Agriculture Management Committee (VCRMC)}” स्थापन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संबंधित जिल्हा

स्तरारुन सदर प्रकल्पाचे संनियंत्रण व समन्वयासाठी स्वतंत्र समिती गठीत करण्यात येणार आहे तथापि, सद्यस्थितीत तात्पुरती व्यवस्था म्हणून जिल्हास्तरावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत गठित केलेल्या समितीकडेच प्रकल्पाचे समन्वय करण्याची जबाबदारी देण्यात येत असून त्याबाबत पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

संदर्भाधिन दि.१९ मे, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत जिल्हा स्तरीय संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समितीचे (DFSMEC) गठन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे -

अ.क्र.	जिल्हास्तरीय समन्वय समिती सदस्य	पदनाम
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	सह-अध्यक्ष
३	उपायुक्त, पशुसंवर्धन	सदस्य
४	प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प	सदस्य
५	जिल्हा समाज कल्याण अधिकारी	सदस्य
६	जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था	सदस्य
७	जिल्हा व्यवस्थापक, एमएआयडीसी	सदस्य
८	जिल्हा व्यवस्थापक, महाबीज	सदस्य
९	जिल्हा पणन अधिकारी, मार्कफेड	सदस्य
१०	नामनिर्देशीत प्रगतशिल शेतकरी	सदस्य
११	शेतकरी स्वयंसहायता गटाचे प्रतिनिधी	सदस्य
१२	अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी	सदस्य
१३	प्रमुख समन्वयक, जिल्हयातील कृषि विज्ञान केंद्र	सदस्य
१४	प्रमुख, जिल्हयातील कृषि संशोधन केंद्र	सदस्य
१५	प्रकल्प संचालक (आत्मा)	सदस्य
१६	जिल्हा व्यवस्थापक, नाबार्ड	सदस्य
१७	व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक	सदस्य
१८	कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद	सदस्य
१९	जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी	सदस्य सचिव

२. उपरोक्त समितीने पुढील आदेशापर्यंत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता देखील जिल्हास्तरावरुन प्रकल्पाची अंमलबजावणी व समन्वय तथा संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने “जिल्हास्तरीय समन्वय समिती” म्हणून कामकाज पहावे .

३. सदर समितीतील प्रतिनिधी शिवाय अन्य विभागांच्या (जलसंधारण, जलसंपदा, आदिवासी विकास इ. विभाग) जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावरुन निमंत्रित करता येऊ शकेल.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०३०१५५९३१७००१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.30 15:47:22 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन), कृषिव पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद,विधानभवन,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई.
१२.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.विभागीय आयुक्त (औरंगाबाद / नाशिक/ अमरावती / नागपूर विभाग)
१४.सर्व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५.मुख्य महाव्यवस्थापक नाबार्ड, पुणे
१६.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, कृषि उद्योग भवन, आरे कॉलनी, गोरेगांव, मुंबई
१७.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बीयाणे महामंडळ, अकोला
१८. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१९.प्रकल्प संचालक, हवामान अनुकूल कृषि प्रकल्प, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई
२०.आयुक्त (पशुसंवर्धन), औध, पुणे
२१.प्रकल्प संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे
२२.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२३.जिल्हा व्यवस्थापक, महाबीज
२४.जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई
२५.जिल्हा उपनिबंधक, सहाकारी संस्था
२६.जिल्हा पणन अधिकारी, मार्कफेड

२७.जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मार्कफेड
२८. उप सचिव/ सह सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
२९.उपायुक्त, पशुसंवर्धन, औध, पुणे
३०.विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
३१. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व)
३२. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र
३३. प्रमुख समन्वय, कृषि संशोधन केंद्र
३४. जिल्हा व्यवस्थापक, नाबार्ड
३५. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
३६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३७. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
३८. वित्त विभाग (व्यय १ / विसु १), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
३९. नियोजन विभाग (कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
४०. निवड नस्ती.